लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय
फक्त ५१०००/- रु.
जेवणासह (अटी लागू)
• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूमसची सोय • २४ तास लाईटची सोय
श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com

विवाहविषयक
सातारा, सांगली, कोल्हापूर मधील मागासवर्गीय वधूसाठी मोफत नाव नोंदणी व परित्यक्ता, विधवा महिलांसाठी नाव नोंदणी चालू आहे.
संपर्क : ८६८९९३४९९६

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक ६२ वा | मंगळवार, दि. २४ सप्टेंबर २०२४ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# मनोज जरांगेना उद्या काही काही झालं तर सरकार जबाबदार

# अंतरवालीच्या व्यासपीठावरून संभाजीराजेंचा इशारा




**जालना (कटूसत्य वृत्त):-** मराठा आरक्षणासाठी उपोषणाच्या सातव्या दिवशी मनोज जरांगे यांची तब्येत प्रचंड खालावली असून त्यांच्या भेटीसाठी संभाजीराजे छत्रपती अंतरवली सराटी येथे दाखल झाले होते.

मनोज जरांगे यांच्या तब्येतीची विचारपूस करत सरकारला एवढी यंत्रणा असून निर्णय घेतला नसल्याचं ते म्हणाले. हे सरकार आंदोलन गुंडाळायलाच बसलंय. मनोज जरांगेंना उद्या काही झालं तर सरकार जबाबदार असेल. मनोज जरांगेंचा जीव महत्त्वाचा असल्याचंही ते म्हणाले.

**मनोज जरांगेंचे रिपोर्ट मला दाखवत जा**

हे सरकार आंदोलन गुंडाळायलाच बसलंय. मनोज जरांगेंच्या तब्येतीबाबत कोणी ऐकलं नाही तर मला सांगा. मनोज जरांगेंचे रिपोर्ट मला दाखवत जा. जरांगेंच्या बाबतीत कोणतीही बेताची परिस्थिती आली तर ते आपल्याला परवडणारे नाही. ज्या दिवशी पाणी पित नाही. अशी परिस्थिती येईल त्या दिवशी संभाजीराजे छत्रपतीला फोन करा, मी कुठेही असलो तरी दुसऱ्या मिनीटाला मी अंतरवली सराटीत येईन. असं संभाजीराजे छत्रपती म्हणाले.

**काय म्हणाले संभाजीराजे छत्रपती?**

अंतरवली सराटीत दाखल झाल्यानंतर संभाजीराजे छत्रपती म्हणाले, मराठा आरक्षणाच्या आंदोलनाबाबत सरकारने अजून निर्णय घेतलेला नाही. तुम्ही सत्तेत बसला आहात. विरोधी पक्षातील नेत्यांनीही सरकार कसं आरक्षण देणार आहे यावर भाष्य करायला हवं. हे आरक्षण कसं टिकणार आहे यावर बोला असं संभाजीराजे छत्रपती म्हणाले. छत्रपती शिवाजी महाराजांनी सगळ्यांना न्याय दिला, अठरापगड जातींसह बारा बलूतेदारांना न्याय दिला. त्यामुळं जे शाहू फुले आंबेडकरांचं नाव घेतात त्या सरकारनं सगळ्यांना न्याय देण्याची भूमिका ठेवावी.

**इथं जर काही झालं तर सरकार जबाबदार**

मनोज जरांगे पाटलांनी तब्येत सांभाळायला पाहिजे. मी त्यांच्याशी व्यक्तीगत बोललोय. मनोज जरांगे पाटलांच्या सोबत मी आधीसुद्धा होतो. आताही आहे. आणि पुढेसुद्ध असणार. असं संभाजीराजे छत्रपती म्हणाले. माझी सरकारला विनंती आहे. इकडे या. काय परिस्थीती आहे ते बघा. तुमच्याकडे हेलिकॉप्टर आहेत. या इकडे बघा काय परिस्थिती आहे. सगळ्या यंत्रणा आहेत तुमच्याकडे. इथं जर काही झालं तर सरकार जबाबदार असणार. विरोधकही तेवढेच जबाबदार असतील. मनोज जरांगे पाटील या समाजासाठी योद्धा म्हणून पुढे आले आहेत. त्यांच्या पाठीशी राहण्याची जबाबदारी या संभाजीराजे छत्रपतींची आहे.

## ग्रामीण पाणीपुरवठा कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशनचे काम बंद आंदोलन सुरू

### पाणीपुरवठा योजनेच्या कामातील विविध अडचणींकडे वेधले लक्ष

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जलजीवन मिशन योजनेअंतर्गत पाणीपुरवठा योजनेची कामे करताना विविध अडचणी येत आहेत. याकडे लक्ष वेधण्यासाठी ग्रामीण पाणीपुरवठा कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशनच्या वतीने काम बंद आंदोलन सुरू करण्यात आले आहे, अशी माहिती अध्यक्ष मोतीलाल राठोड यांनी पत्रकार परिषदेत दिली.



असोसिएशनच्या वतीने यापूर्वी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले होते मात्र त्यानंतरही कोणत्याही अडचणींचे निराकरण झाले नाही. यामुळे अखेर असोसिएशनच्या वतीने काम बंद आंदोलन सुरू करण्यात आले आहे. निविदा चौकशीतील कामांची गेल्या 18 महिन्यांपासून प्रलंबित देयके अदा करण्यात आली नाहीत. निविदांची चौकशी कोणाच्या तक्रारीवरून झाली? चौकशी करण्याचे आदेश कोणी दिले? चौकशी समितीने अहवाल काय दिला? अहवालानुसार दोष असलेल्या अधिकारी- कर्मचारी यांच्यावर काय कारवाई झाली? बिले कोणाच्या आदेशानुसार थांबविण्यात आले? तसे लेखी आदेश कोणी दिले? कामाची चौकशी नसताना बिले थांबवण्याचे कारण काय असा प्रश्न यावेळी मोतीलाल राठोड यांनी उपस्थित केला.

जल जीवन मिशन योजनेअंतर्गत दहा टक्के रक्कम न ठेवता काम अंतिम करणे याबाबत निवेदन देण्यात आले होते. निविदा प्रक्रियेमध्ये ग्रामपंचायत कडील दहा टक्के लोक वर्गणीचा ठेकेदारांशी काहीही संबंध नाही. ग्रामपंचायतीने लोक वर्गणी न भरल्यामुळे ठेकेदारांच्या देयकातून सरसकट दहा टक्के रक्कम कपात करण्यात येत आहे. हे अन्यायकारक आहे, असा आरोप राठोड यांनी केला आहे. विविध 7 मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी हे काम बंद आंदोलन करण्यात येत आहे.

या पत्रकार परिषदेस विवेक राठोड, आनंद तोडकरी, अभिमन्यू पवार, राहुल कोलगे, बालाजी चव्हाण, राहुल सोनी , सूर्यकांत बिराजदार, अस्लम शेख, पांडुरंग पवार, विनोद चव्हाण, संजू चव्हाण, अतुल खुळे आदी उपस्थित होते.

## फरार आरोपींना वाचविण्यासाठी अक्षय शिंदेचा एन्काऊंटर केला का ?

### शिंदेला संपवून प्रकरण दाबण्याचा वरिष्ठ पातळीवरून प्रयत्न केला जातोय का?

### सत्य समोर येण्यासाठी एन्कांऊटरची न्यायालयीन चौकशी करावी; काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांची मागणी



**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** बदलापूरमधील चिमुरड्यांवरील अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याचा पोलीस एन्काऊंटर मध्ये मृत्यू झाल्याची बातमी येत आहे. पोलिसांच्या ताब्यातील आरोपी पोलीस अधिका-याची बंदूक हिसकावून पोलिसांवर आणि स्वतःवर गोळीबार केला व पोलिसांनी स्वसंरक्षणार्थ केलेल्या गोळीबारात शिंदेचा मृत्यू झाल्याची माहिती मिळतेय पण या घटनेमुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाचे सत्य बाहेर येण्यासाठी उच्च न्यायालयाच्या विद्यमान न्यायमूर्तीमार्फत या प्रकरणाची चौकशी चौकशी करावी अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.

या संदर्भात बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, चिमुरड्यांवर अत्याचार करणारा आरोपी अक्षय शिंदे याला कायद्याने न्यायालयाच्या माध्यमातून कठोर शिक्षा झालीच पाहिजे होती याबद्दल कुणाचेही दुमत असू शकत नाही. पण एका गंभीर गुन्ह्यातील आरोपी पोलिसांच्या ताब्यात असताना पोलिस अधिका-याची बंदूक हिसकावून घेऊन आरोपी गोळीबार करतो ही बाब अत्यंत गंभीर आहे.

या घटनेमुळे अनेक गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.

१. पोलीस अधिकारी इतके बेसावध आणि निष्काळजीपणे आरोपींना घेऊन जातात का ?

२. एक महिना उलटला तरीही बदलापूर अत्याचार प्रकरणातील शाळेच्या विश्वस्तांना अद्याप अटक झालेली नाही वरिष्ठ पातळीवरून कोणाच्या तरी आदेशावरून त्या आरोपींना अटक करण्यासाठी टाळाटाळ केली जात आहे का ?

३. फरार आरोपींना वाचवण्यासाठी या प्रकरणातील मुख्य आरोपीचे एन्काऊंटर करून प्रकरण संपवण्याचा प्रयत्न आहे का ?

४. हे संपूर्ण प्रकरण दाबण्याचा वरिष्ठ पातळीवरच्या प्रयत्नांचा भाग म्हणून पोलिसांमार्फत आरोपीचे एन्काऊंटर केले आहे का?

५. पोलीस कस्टडीत आरोपींना संपवून प्रकरण दाबण्याचा उत्तरेतील राज्यातला पॅटर्न महाराष्ट्रात आणला जात आहे का ?

अक्षय शिंदे याच्या कुटुंबियांनीही पोलिसांनी पैसे घेऊन त्याची हत्या केल्याचा आरोप केला आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाचे सत्य समोर येण्यासाठी उच्च न्यायालयाच्या विद्यमान न्यायमूर्तींमार्फत चौकशी केली पाहिजे अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्षांनी केली आहे.

## राष्ट्रवादीच्या महेश मानेंना लॉटरी; स्वत: शरद पवारांनी दिली संमती

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या सोलापूर जिल्हा कार्यालयीन सरचिटणीस तथा प्रवक्ते पदावर दक्षिण सोलापूर तालुक्यातील महेश माने यांची शरद पवार यांच्या हस्ते जिल्हाध्यक्ष बळीराम साठे यांच्या उपस्थितीत गोविंदबाग बारामती येथे निवड करण्यात आली.



यावेळी माढा विधानसभेचे नेते संजय कोकाटे, मोहोळ तालुका अध्यक्ष विनय पाटील, माढा तालुका अध्यक्ष बाळासाहेब पाटील, काँग्रेसचे माढा तालुका अध्यक्ष ऋषिकेश बोबडे, वडाळा ग्रामपंचायत सदस्य मनोज साठे आदी उपस्थित होते.

मागील काही दिवसांपूर्वी सोलापूर शहरातील प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या उपस्थितीत झालेल्या एक कार्यक्रमात महेश माने यांनी निष्ठावंतांचा मुद्दा उपस्थित करत नवीन आलेल्या लोकांना दिल्या जाणाऱ्या पदाबद्दल प्रश्न उपस्थित करत वाद घातला होता. त्यावेळी त्यांच्यावर कारवाई करून त्यांचे पक्षातून निलंबन व्हावे यासाठी एक गट सक्रिय होता. झालेल्या वादाबद्दल आणि होत असलेल्या अन्यायाबद्दल महेश माने यांनी युवा आमदार रोहित पवार तसेच राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांची दिल्ली, मुंबई, पुणे तसेच बारामती येथे भेट घेऊन माहिती दिली होती.

## मुख्यमंत्र्यांचा सोलापूर दौरा पाचव्यांदा पुढे ढकलला

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा सोलापूर दौरा पुन्हा एकदा रद्द झाला आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या वचनपूर्ती सोहळ्यासाठी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री येत्या बुधवारी (ता.25 सप्टेंबर) सोलापूरला येणार होते. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या महाराष्ट्र दौऱ्यामुळे मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांचा सोलापूर दौरा पुढे ढकलण्यात आला आहे. याबाबतची माहिती प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून देण्यात आली.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा वचनपूर्ती सोहळा सोलापुरात घेण्याची घोषणा राज्य सरकारच्या वतीने करण्यात आली होती. त्याचे नियोजनही जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले होते. सोलापूरच्या होम मैदानावर हा मेळावा होणार होता. मात्र, सलग पाचव्यांदा हा मेळावा पुढे ढकलावा लागण्याची नामुष्की प्रशासनावर आली आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील पात्र लाभार्थींना अनुदानाचे वाटप करण्यासाठी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री हे येत्या बुधवारी (ता. 25 सप्टेंबर) सोलापूरच्या दौऱ्यावर येणार होते. त्यांच्या दौऱ्याची संपूर्ण तयारी करण्यात आली होती. या सोहळ्यासाठी सोलापूर शहर आणि जिल्ह्यातून तब्बल 40 हजार महिलांना आणण्याचे नियोजनही प्रशासनाकडून करण्यात आले होते. या कार्यक्रमाची संपूर्ण तयारी प्रशासनाच्या वेगवेगळ्या समित्यांकडून पूर्ण करण्यात आलेली होती.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि दोन्ही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांचा दौरा रद्द झाल्याची माहिती शुक्रवारी रात्री उशिरा जिल्हा प्रशासनाकडून मिळाली, त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा सोलापूर दौरा तब्बल पाचव्यांदा पुढे ढकलण्याची नामुष्की जिल्हा प्रशासनावर आली आहे.

**पंतप्रधान, गृहमंत्र्यांचा महाराष्ट्र दौरा**

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे येत्या आठवड्यात महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येत आहेत, त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि दोन्ही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांना त्यांच्या दौऱ्यावर उपस्थित राहावे लागणार आहे. त्यामुळे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना आपल्या दौऱ्यामध्ये बदल करावा लागला. त्यातून सोलापूरमधील माझी लाडकी बहीण योजनेचा कार्यक्रमासाठी दौरा मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना पुढे ढकलावा लागला.

## सोलापूर विभागातून धावणाऱ्या पाच विशेष रेल्वे गाड्यांना मुदतवाढ

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूरकरांना एक आनंदाची बातमी रेल्वे प्रशासनाने दिली आहे. आगामी दसरा, दिवाळीच्या सुट्टीत प्रवाशांची अतिरिक्त होणारी गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेने सोलापूर विभागातून धावर्णाया सोलापूर-मुंबई लोकमान्य टिळक टर्मिनस-सोलापूर एक्स्प्रेस, सोलापूर-तिरुपती-सोलापूर, सोलापूर-दौंड-सोलापूर, सोलापूर-कलबुर्गी (गुलबर्गा)-सोलापूर आणि पुणे-हरंगुळ (लातूर)-पुणे या पाच विशेष रेल्वे गाड्यांना डिसेंबरअखेरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे सोलापूरकरांना दसरा, दिवाळीत सुट्टीचा आनंद घेता येणार आहे.

दरम्यान, सोलापूर-लोकमान्य टिळक टर्मिनस ही साप्ताहिक गाडी 29 सप्टेंबरला धावणार होती. आता एक ऑक्टोबर ते 31 डिसेंबरपर्यंत धावणार आहे. लोकमान्य टिळक टर्मिनस-सोलापूर ही 25 सप्टेंबरपर्यंत धावणार होती. आता दोन ऑक्टोबर ते एक जानेवारी 2025 पर्यंत धावणार आहे. तसेच सोलापूर-तिरुपती साप्ताहिक एक्स्प्रेस ही 26 सप्टेंबरपर्यंत धावणार होती. आता तीन ऑक्टोबर ते 26 डिसेंबरपर्यंत धावणार आहे. तिरुपती-सोलापूर ही 27 सप्टेंबरपर्यंत होती. आता चार ऑक्टोबर ते 27 डिसेंबरपर्यंत धावणार आहे. सोलापूर-दौंड-सोलापूर डेमू ही 30 सप्टेंबरपर्यंत होती. आता एक ऑक्टोबर ते 31 डिसेंबरपर्यंत धावणार आहे. सोलापूर-कलबुर्गी-सोलापूर डेमू ही 30 सप्टेंबरपर्यंत होती आता एक ऑक्टोबर ते 31 डिसेंबरपर्यंत धावणार आहे. तर, पुणे-हरंगुळ (लातूर)-पुणे ही नियमित धावणारी एक्स्प्रेस 30 सप्टेंबर पर्यंत होती. आता ही गाडी एक ऑक्टोबर ते 31 डिसेंबरपर्यंत धावणार आहे.

## साने गुरुजी शिक्षक पतसंस्थेच्यावतीने गुणवंत शिक्षक पुरस्कार वितरण



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** साने गुरुजी शिक्षक सहकारी पतसंस्थेच्यावतीने देण्यात येणाऱ्या गुणवंत शिक्षक पुरस्काराचे वितरण राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त शिक्षक बाळासाहेब वाघ यांच्या हस्ते झाल्याची माहीती संचालक सुनिल चव्हाण यांनी दिली. जुळे सोलापुरातील गोविंदश्री मंगल कार्यालयात हा कार्यक्रम नुकताच पार पडला. यावेळी व्यासपीठावर माजी प्रशासनाधिकारी काशिनाथ बिराजदार, गुरुनाथ वांगीकर, चेअरमन भिमराया कापसे, सिद्धाराम माशाळे, दिलीप चौगुले, आप्पाराव इटेकर, सोमेश्वर याबाजी, अनिल गायकवाड, अ.गफुर अरब, नितीन कुलकर्णी, बंदेनवाज शेख, भारत गुणापुरे, आदी उपस्थित होते. चांगले काम करर्णाया शिक्षकांच्या पाठीवर शाबासकीची थाप देणे गरजेचे आहे. पुरस्कारामुळे शिक्षकांना प्रेरणा मिळते. असे मत बाळासाहेब वाघ यांनी व्यक्त केले. यावेळी मुख्याध्यापक संतोषकुमार माशाळे, बसवेश्वर जुंदळे, अंबादास चव्हाण, राहुल बनसोडे यांना साने गुरुजी पुरस्काराने तर हाजी रचभरे उर्दु मॉडेल स्कुल या शाळेला आदर्श शाळा पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन नर्मदा मिठ्ठ यांनी तर मुरलीधर कडलासकर यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी भाऊसाहेब मोरे, विरभद्र यादवाड, विनोद आगलावे, जयंत गायकवाड, उल्हास बिराजदार, धनाजी मोरे, शिवानंद हिरेमठ, महादेवी पाटील, फरजाना रचभरे यांनी प्रयत्न केले.

पाहिजेत
दैनिक सोलापूर कटूसत्य
सोलापूर वृत्तदर्पण

सोलापूर वृत्तदर्पण व दैनिक कटूसत्य या माध्यमांच्या वतीने एक अभिनव व अनोखी योजना राबविण्याचा संकल्प आहे त्यासाठी सोलापूर शहरातील प्रत्येक प्रभागात व जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात कायम पगारावर खालील पदे भरावयाची आहेत. या करीता सोलापूर शहरातील प्रत्येक प्रभाग, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट, बार्शी, मोहोळ, माढा, करमाळा, पंढरपूर, माळशिरस, सांगोला, मंगळवेढा या तालुका परीसरात एक प्रतिनिधी नेमणे आहेत. ही योजना यशस्वी करण्यासाठी खालील पदे भरावयाची आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | लिंग | पगार/मानधन व कमिशन (मासिक) | अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | व्यवस्थापक | २ | एम. बी.ए / पदवीधर | स्त्री/पु | १५००० ते २०००० रुपये. | असल्यास प्राधान्य |
| २) | सहाय्यक व्यवस्थापक | ४ | एम. बी.ए / पदवीधर | स्त्री/पु | १०००० ते १५००० रुपये | असल्यास प्राधान्य |
| ३) | सह संपादक | ५ | वृत्तपत्र पदविका / पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे | असल्यास प्राधान्य |
| ४) | उप संपादक | ५ | वृत्तपत्र पदविका / पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे | असल्यास प्राधान्य |
| ५) | पत्रकार / वार्ताहर | २५ | १२ वी ते पदवीधर | स्त्री/पु | ३००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ६) | कॅमेरामन | २५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ३००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ७) | मार्केटींग प्रतिनिधी | ६५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ८) | जाहिरात प्रतिनिधी | ६५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ९) | प्रशिक्षण अधिकारी | १ | एम. बी.ए. / पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रुपये. | असल्यास प्राधान्य |
| १०) | वसूली प्रतिनिधी | ५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |

नियम व अटी :- १) इच्छूक उमेदवारांनी आपल्या स्वहस्ताक्षरात संपूर्ण माहिती असलेला अर्ज भरुन, त्या सोबत शाळेचा दाखला, मार्कलिस्ट, भारतीय असल्याचा पुरावा, दोन फोटो जोडून, खालील पत्त्यावर १५ दिवसाच्या आत आणून द्यावे. २) वयोमर्यादा १८ वर्ष पूर्ण ते ४५ वर्षापर्यंत, एक उमेदवार दोन पदासाठी अर्ज करु शकतो. ३) सर्व अधिकार वृत्तदर्पण कडे राखीव राहतील आणि ते अर्जदारांवर बंधनकारक राहतील. वृत्तदर्पण चा निर्णय अंतिम राहील. ४) सदरच्या नियुक्त्या केवळ मुलाखती घेऊनच केल्या जातील. आमच्या व आपल्या वेळेनुसार मुलाखत घेतली जाईल. उमेदवारांनी याची नोंद घ्यावी. ५) अर्ज स्वीकारण्याची वेळ रविवार सोडून सकाळी १० ते सायं. ६ वाजेपर्यंत. ६) मुलाखतीनंतर निवड झालेल्या सर्व उमेदवारांना मोफत प्रशिक्षण दिले जाईल. ७) स्वतःचे वहान असणाऱ्यास प्राधान्य.

फोन : 0217-2605091 मो.9657069069
संपर्क :- वृत्तदर्पण कार्यालय, एफ-३, वृंदावन पार्क, चेतन फौन्ड्रीसमोर, होटगी रोड, सोलापूर-३.

## संपादकीय

# प्रसादाची परीक्षा

केवळ भारतातीलच नव्हे तर जगातील सर्वात जास्त भक्त ज्या देवस्थानाला भेट देतात त्या तिरुपती देवस्थानच्या लाडू प्रसादाच्या शुद्धतेचा प्रश्न निर्माण झाल्याने निश्चितच कोट्यवधी भाविकांच्या भावनांशी खेळ झाला आहे.

तिरुपती तिरूमला देवस्थानच्या प्रशासकीय अधिकर्यांनी पूर्वीप्रमाणेच आताही लाडूची शुद्धता जपण्यात आली असल्याचा दावा केला असला, तरी ज्या काळात अशा प्रकारे अशुद्ध लाडू पुरवण्यात आले होते त्या काळात ज्या भक्तांनी तो प्रसाद ग्रहण केला होता त्यांच्या मनात मात्र अनेक शंकांचे वारूळ तयार होऊ लागले आहे. आंध्र प्रदेशचे विद्यमान मुख्यमंत्री चंद्रबाबू नायडू यांनी गेल्या आठवड्यामध्ये माजी मुख्यमंत्री आणि वायएसआर काँग्रेसचे नेते जगनमोहन रेड्डी यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कालावधीमध्ये तिरुपती देवस्थानाच्या लाडू प्रसादामध्ये मोठ्या प्रमाणावर भेसळ झाल्याचा आरोप केला होता. त्यांचा हा आरोप खरा असल्याचे नंतर प्रयोगशाळेतील निष्कर्षावरूनही समोर आले होते.

गेल्या काही कालावधीमध्ये तिरुपतीमध्ये भक्तांना मिळर्णाया लाडू प्रसादाच्या दजार्बाबत नेहमीच तक्रारी केल्या जात होत्या. या तक्रारीची दखल देवस्थान प्रशासकीय मंडळांनी घेतल्यानंतर लाडूचे काही नमुने तपासण्यासाठी गुजरातमधील प्रयोगशाळेत पाठवण्यात आले. या प्रयोगशाळेचे निष्कर्ष जेव्हा समोर आले तेव्हा त्यातून अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या. एक तर हा प्रसाद तयार करण्यासाठी अत्यंत खालच्या दजार्चे तूप वापरण्यात येत होते आणि या तुपामध्ये जनावरांची चरबी आणि फिश ऑइलसारखे पदार्थ वापरण्यात आल्याचे लक्षात आले. प्रयोगशाळेतून आलेल्या अहवालामध्ये स्पष्टपणे या गोष्टी नमूद करण्यात आल्याने प्रशासकीय मंडळाने त्याची दखल घेऊन संबंधित पुरवठादाराला जरी काळ्या यादीत टाकले असले आणि भविष्यात शुद्ध लाडू प्रसाद तयार करण्याची हमी दिली असली, तरी या संपूर्ण घटनेमुळे भक्तांच्या मनाशी जो खेळ झाला आहे त्याचा विचार करावाच लागणार आहे.

केवळ तिरुपतीच नाही, तर भारतामधील ज्या प्रमुख देवस्थानांमध्ये अशा प्रकारचा प्रसाद दिला जातो किंवा काही देवस्थानांमध्ये जेवणासारखा महाप्रसादही दिला जातो अशा सर्वच देवस्थानांमध्ये सर्वोच्च प्रकारची स्वच्छता आणि शुद्धता पाळली जात असली, तरी अशा प्रकारच्या घटनांमुळे कोट्यवधी भक्तांच्या मनात शंका निर्माण झाल्यास नवल नाही. एखादा भक्त जेव्हा तिरुपतीसारख्या देवस्थानाला जातो तेव्हा तो आवर्जून लाडू प्रसाद खरेदी करतो आणि आपल्या गावी परत आल्यानंतर अनेक मित्रांना आणि नातेवाईकांना त्या प्रसादाचे वाटप करत असतो. साहजिकच ज्या कालावधीमध्ये अशा कमी गुणवत्तेच्या आणि बीफचा वापर केलेल्या लाडू प्रसादाची निर्मिती होत होती त्या कालावधीमध्ये ज्यांनी ज्यांनी तिरुपतीची यात्रा केली होती आणि ज्यांनी ज्यांनी हा लाडू प्रसाद ग्रहण केला होता त्यांच्यामध्ये हजार शंका निर्माण झाल्या आहेत. आयुष्यभर शाकाहारी राहर्णाया अनेक लोकांनी हा प्रसाद त्याकाळात ग्रहण केला असण्याची शक्यता असल्यामुळे त्यांच्या मनातसुद्धा अपराधीपणाची भावना निर्माण झाली असेल.

त्याचप्रमाणे लाडू प्रसादासारख्या पदार्थामध्ये जेव्हा अशा प्रकारची चरबी मिसळलेली लक्षात येते तेव्हा मांसाहार करणार्यांच्या मनातही त्याच तीव्रतेची भावना निर्माण झाली असेल. हा सर्व जरी मानसिक विषय असला तरी ज्या प्रकारे व्यवस्थापनाचे दुर्लक्ष झाल्यामुळे अशा प्रकारे प्रसादाचीच परीक्षा पाहिली गेली त्याची चौकशी होण्याची मात्र गरज आहे. ज्या कालावधीत हे लाडू तयार करण्यात आले होते त्या कालावधीमध्ये पुरवठादाराने 320 रुपये किलो दराने तुपाचा पुरवठा केला होता आणि भारताच्या कोणत्याही राज्यामध्ये किंवा शहरामध्ये कुठेही इतक्या कमी दरात शुद्ध तूप उपलब्ध होत नाही. साहजिकच पुरवठादारांनी काहीतरी भेसळ करूनच अशा प्रकारचे तूप पुरवले असावे याची शंका त्या काळामध्ये प्रशासकीय अधिकर्यांना यायला हवी होती. अर्थात, उशिरा का होईना प्रसादाचा दर्जा पूर्वीप्रमाणे राखला जात नसल्याची तक्रार भक्तांकडून होऊ लागल्यावर प्रशासकीय मंडळाने तपासणी केल्यामुळे हा प्रकार उघडकीस आला.

आता या निमित्ताने आगामी कालावधीमध्ये सर्व भक्तांना शुद्ध तुपातील आणि गुणवत्ता राखलेलाच लाडू प्रसाद दिला जाईल अशी खात्री तरी या निमित्ताने दिली जाऊ शकते. पण तिरुपती देवस्थानाच्या लाडू प्रसादानेच अशी परीक्षा दिल्यानंतर आता सरकारला देशातील सर्वच देवस्थानांमध्ये जो लाडू प्रसाद पुरवठा केला जातो त्याची गुणवत्ता राखली जाते का नाही याची खात्री करावी लागणार आहे. अन्यथा विनाकारण अशा प्रकरणातून धार्मिक रंग दिलेला एखादा विषय समोर येऊ शकतो.

लाडू प्रसादामध्ये चरबी आणि माशाचे तेल वापरल्याचे तपासणी अहवालातून सिद्ध झाल्यावरही या विषयाबाबत सर्वांनी संयम बाळगला असल्याने फारशी गंभीर परिस्थिती उद्भवलेली नाही; पण अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती झाली तर मात्र हा विषय कोणते वळण घेईल हे सांगता येत नाही. म्हणूनच आता सरकारने सर्वच देवस्थानांना प्रसादाची शुद्धता राखण्यासाठी सर्वोच्च काळजी घ्यावी आणि कच्च्या मालाच्या पुरवठादारांवर लक्ष ठेवावे, असे आदेश देण्याची गरज आहे.

# दि मॉडेल विविधांगी प्रशालेतील विद्यार्थ्यांची मोफत दंत तपासणी



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** दि मॉडेल विविधांगी प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, माळीनगर येथे डॉ.नाळे मल्टीस्पेशालिटी डेंटल क्लिनिक बारामती यांचे वतीने घेण्यात आलेल्या मोफत दंतचिकित्सा शिबिरात प्रशालेतील जवळपास ६०० विद्यार्थी व शिक्षक यांची नुकतीच मोफत दंत तपासणी करण्यात आली. दि मॉडेल विविधांगी प्रशालेच्या माजी विद्यार्थीनी व रामभाऊ परुळेकर विद्यानिकेतन,तळेगाव दाभाडे पुणे येथील माजी शिक्षिका स्नेहलताई दत्तात्रय बाळसराफ यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून गुरुवारी येथील दि मॉडेल विविधांगी प्रशालेत इंडियन डेंटल असोसिएशन बारामती,आधार मेडिकल फाउंडेशन बारामती,आणि डॉ.नाळे मल्टीस्पेशालिटी डेंटल क्लिनिक बारामती यांचे वतीने डॉ.केतकी नाळे यांनी या मोफत दंतचिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबाराचे उदघाटन प्राचार्य दत्तात्रय बाळसराफ, स्नेहलताई बाळसराफ, सासवड माळी एज्युकेशन सोसायटीचे सचिव अजय गिरमे, खजिनदार ज्योतीताई लांडगे, संचालक कल्पेश पांढरे यांचे हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. यावेळी अजित गिरमे, रवींद्र देशपांडे, प्रदीप नागटिळक, सतीश देशमाने, डॉ.स्नेहा टिळेकर, नेहा भोपळे, आकांक्षा बाजकर, आकाश जगताप तसेच प्रशालेचे प्राचार्य कलाप्पा बिराजदार, उपप्राचार्य रितेश पांढरे, पर्यवेक्षक कल्याण कापरे, बाळासाहेब सोनवणे आदी शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.या दंतचिकित्सा शिबिराचे उद्घाटनप्रसंगी स्नेहलताई बाळसराफ यांच्या वाढदिवसानिमित्त दि सासवड माळी एज्युकेशन सोसायटी माळीनगर या संस्थेच्या वतीने त्यांचा फेटा बांधून, शाल व बुके देऊन सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या. प्राचार्य दत्तात्रय बाळसराफ, स्नेहलताई बाळसराफ,डॉ.केतकी नाळे यांनी यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय बांदल यांनी तर नवनाथ गायकवाड यांनी आभार मानले.

# भारतानेही सतर्क राहावे

इस्राईल आणि हमास यांच्या युद्धातील नवा अंक आता सुरू झाला आहे. दोन दिवसांपूर्वी या युद्धात नव्या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आणि संपूर्ण जगात तंत्रज्ञानाचा उपयोग आणि दुरुपयोग यावर पुन्हा चर्चा होऊ लागली. दोन दिवसांपूर्वी लेबनॉन मध्ये एकाच वेळी हजारो पेजरचा स्फोट झाला. हा स्फोट ताजा असतानाच त्याच्या दुसऱ्या दिवशी लेबनॉनमध्येच हजारो वकिटॉकीचा स्फोट झाला. या स्फोटात हजारो हिजबुल्ला जखमी झाले तर काहींना जीव गमवावा लागला. जगभर या स्फोटाची चर्चा सुरू झाली. हा स्फोट इस्राईलची गुप्तचर संघटना मोसादने घडवून आणला असा आरोप लेबनॉनने केला असून या स्फोटाला लवकरच जशास तसे उत्तर देण्यात येईल अशी घोषणा केली. या स्फोटा नंतर संपूर्ण जगात खळबळ माजली. पेजर सारख्या छोट्या उपकरणाचा संहारक शस्त्र म्हणून वापर करता येऊ शकतो असा विचारच कोणी केला नाही. वास्तविक पेजर हे सध्या कालबाह्य झालेले उपकरण आहे. १९९० साली आलेले हे उपकरण एकमेकांशी संपर्क करण्यासाठी वापरले जात असे. अर्थात यात फोन प्रमाणे बोलता येत नाही तर या उपकरणाद्वारे फक्त एकमेकांना छोटे टेक्स्ट मेसेज पाठवता येतात. भारतात हे उपकरण १९९५ साली आले मात्र म्हणावे तसे हे उपकरण यशस्वी ठरले नाही. मोबाईल आल्यानंतर तर त्याचा वापरच संपला असे असतानाही कालबाह्य झालेले हे उपकरण हिजबुल्ला का वापरत होते असा प्रश्न पडला असे ल तर त्याचे उत्तर असे आहे की पेजर वापरकत्यार्चे लोकेशन ट्रेस करता येत नाही. केवळ मेसेज पाठवला जात असल्याने मेसेज दोघांशिवाय तीसऱ्याला दिसत नाही म्हणूनच हीजबुल्ला चे कमांडर हे उपकरण वापरत होते. हे उपरकरण सुरक्षित आहे असा त्यांचा समज होता मात्र हा समज तेंव्हा खोटा ठरला जेंव्हा लेबनॉन मध्ये एका पाठोपाठ एक स्फोट झाले. लेबनॉन मध्ये ज्या पेजरचा स्फोट झाला त्या पेजरमध्ये अल्पप्रमाणात पेइटीएन स्फोटकांचा वापर करण्यात आला होता. या पेजरमध्ये ज्या बॅटरया वापरण्यात आल्या होत्या त्या आयात करण्यात आल्या होत्या. याच बॅटर्यामध्ये हे स्फोटके लपवले होते असे म्हंटले जाते. या स्फोटानंतर जगभर इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या सुरक्षेचा प्रश्न उपस्थित केला जात आहे. भारततही आता तसाच प्रश्न विचारला जात आहे कारण भविष्यातील युद्ध हे अशाच तंत्रज्ञानाचा वापर करून लढले जाणार आहे. आज जे तंत्रज्ञान वापरून इस्राईलने हा हल्ला केला तेच तंत्रज्ञान जर अतिरेक्यांच्या हातात लागले तर जगभर हाहाकार उडेल. भारतात तर अब्जावधी लोक मोबाईल वापरतात. जगात सर्वात जास्त मोबाईल भारतीय नागरिक वपरतात. आज जर पेजर, वॉकीटॉकीचा वापर बॉम्ब म्हणून केला जातो तर भविष्यात मोबाईलही बॉम्ब होऊ शकतो. भारतात जे मोबाईल वापरण्यात येतात त्याची बॅटरी ही परदेशातून आयात केलेली असते. भारतात वापरण्यात येत असलेल्या ९० टक्के मोबाईलच्या बॅटरया या चीन, तैवान आणि हाँगकाँग येथून आपण आयात करतो केवळ मोबाईल किंवा मोबाईलची बॅटरीच नाही तर दररोज पाच लक्ष इलेक्ट्रॉनिक वस्तू आपण परदेशातून आयात करतो. भारतातील संबंधित अथॉरिटी देखील मान्य करेल की देशात आयात होणाऱ्या ९० टक्के उपकरणांची कोणतीही तपासणी होत नाही. यावरून लक्षात येईल की आपल्या देशात किती धोकेदायक परिस्थिती आहे. देशातील प्रत्येक नागरिक आपल्या खिशात एक बॉम्ब घेऊन फिरतोय असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. मागील काही दिवसात जम्मू काश्मीरमध्ये अतिरेकी पुन्हा सक्रिय झाले आहेत. काश्मीरमध्ये घुसखोरी वाढली आहे. सीमेवर दहशतवादी कारवाया वाढल्या आहेत. गुप्तचर संस्थांच्या चौकशीतून हे निष्पन्न झाले आहे की अतिरेकी घुसखोरी करताना मोठ्या प्रमाणात मोबाईल ॲपचा वापर करत आहेत. या ॲप चा वापर गियारीहक पर्वतावर, डोंगरावर चडण्यासाठी करतात आता याच ॲपचा वापर करत अतिरेकी घुसखोरी करत आहेत. चीन तर आपला १ नंबर चा शत्रू आहे. तंत्रज्ञानाचा दुरुपयोग करण्यात चीनचा हातखंडा आहे. उद्या लेबनॉन स्फोटात वापरण्यात आलेले तंत्रज्ञान अतिरेक्यांच्या हाताला लागले किंवा चीन सारखा देश त्याचा वापर शस्त्र म्हणून करू लागला तर तर काय होईल याचा विचारही करवत नाही म्हणूनच भारताने याबाबत दक्ष राहायला हवे. भारतात विदेशातून येणाऱ्या सर्व इलेक्ट्रॉनिक उपकरणांची तसेच वस्तूंची १०० टक्के तपासणी व्हायला हवी. मोबाईल, टॅब्लेट, लॅपटॉप, स्मार्ट वॉच यासारख्या गॅझेट वापरा संदर्भात सरकारने गाईड लाईन निश्चित करण्यात करावी. प्रत्येक नागरिकांना या बाबत प्रशिक्षण द्यावे. लेबनॉन मध्ये जे झाले ते भारतात होऊ नये यासाठी सरकारने आतापासूनच दक्ष राहून योग्य ती खबरदारी घ्यावी कारण युद्धाच्या या नव्या प्रकाराचा धोका भारताला अधिक आहे. भारताने लेबनॉन पासून धडा घ्यायला हवा.



**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

## प्रबोधन

# थोर व्यक्तीविषयक भयभीता धीट । करितो महात्मा

महात्मा जोतिराव फुले यांचे समकालीन न्या. रानडे यांनी तत्कालीन महाराष्ट्र अचेतन झालेल्या थंड गोळ्यासारखा वाटतो, असं खेदाने नमूद केलं होतं आणि ते खोटं नव्हतं. शोषणकर्ते ब्राह्मण शोषण करून थंड झाले होते आणि शोषित बहुजन सर्वस्व गमावून थंड झाले होते. म्हणूनच क्रांतिबा जोतिरावांनी शोषणकर्त्यांना आसूड मारून तापवलं. बहुजनांची मनं, असत्याखाली दडपलेलं सत्य दाखवून पेटवली. क्रांतीची आग बहुजन समाजात निर्माण झाल्यावर ती कायमस्वरूपी पेटत राहावी, या उद्देशानेच महात्मा जोतिरावांनी सत्यशोधक समाजची स्थापना २४ सप्टेंबर १८७३ रोजी केली. त्यानंतर महाराष्ट्राच्या थंड गोळ्यात थोडी थोडी हालचाल, चळवळ दिसू लागली. प्रा. गं. बा. सरदार म्हणतात, 'कष्टकरी समाजाला जाग आणण्यासाठी आणि संघटित होऊन आपल्या अधिकारप्राप्तीस्तव संघर्षशील बनवण्यासाठी जोतिरावांनी सत्यशोधक समाजची स्थापना केली. त्यांच्या या प्रयत्नाचं युगपरिवर्तनकारी स्वरूप लक्षात आल्यामुळेच जसे बहुजनांचे नेते डॉ. विश्राम घोले, रामशेट उरवणे, राजन्ना लिंगू, रामय्या अय्यावारू, लक्ष्मण शिंदे आदि सत्यशोधक समाजात सहभागी झाले; तसंच समतोल विचारवंत न्या. महादेव गोविंद रानडे, लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, डॉ. भांडारकर, गोवंडे असे ब्राह्मणही महात्मा फुले यांचे समर्थक बनले!'

महात्मा फुले यांना थॉमस पेन यांच्या निबंधातून क्रांतीची प्रेरणा प्राप्त झाली, असं प्रा. रा. ग. जाधव यांनी स्पष्ट केलं आहे. म्हणजे, सत्यशोधक समाजच्या स्थापनेची मूळं पाश्चिमात्य पुरोगामी विचारधारेत शोधावी लागतील. प्रा. जाधव म्हणतात, 'जोतिरावांच्या अपूर्व क्रांतिकारकतेचं रहस्य हे थॉमस पेनप्रणीत पश्चिमी संस्कृतीच्या आकृतिबंधात शोधावं लागेल.'

भारतीय विचार परंपरेत ईश्वरेच्छा आणि भाग्यवादाशिवाय काही नसल्याने सत्यशोधकाला नवविचारांच्या, विज्ञाननिष्ठेच्या, बुद्धिप्रामाण्यवादाच्या, स्वातंत्र्य-समता-बंधुतेच्या मदतीने भारतीय जनमानस निर्मळ करण्यासाठी, जोतिरावांनी जी विचारधारा प्रवाहित केली, तिचंच नाव होतं- सत्यशोधक समाज, धर्म आणि संस्कृतीच्या सोज्वळ नावाखाली ब्राह्मणवर्ग समाजाचं जे आर्थिक शोषण करीत होता आणि कर्मकांडांची मायावी सृष्टी उभी करून जो सामाजिक अत्याचार करत होता, हे सारं कर्म अत्यंत हिडीस आणि पराकोटीचं घृणास्पद होतं. म्हणून जोतिरावांनी ब्राह्मणी कपटातील असत्य शोधण्यासाठी सत्यशोधक समाज स्थापन केला. प्रा. गं. बा. सरदार म्हणतात, 'धार्मिक व सामाजिक गुलामगिरी समूळ नष्ट करणं, हे सत्यशोधक समाजाचं मुख्य उद्दिष्ट होतं.'

'लोकजीवन ग्रासणारे राहू-केतू असे जे शेठजी व भटजी होते त्यांच्यावरच जोतिराव तुटून पडत होते.' असं चरित्रकार कृ. गो. सूर्यवंशी म्हणतात आणि महात्मा फुलेंच्या काळी भटजीच शेठजीचं काम करीत, असा इतिहास आहे.

सत्यशोधक समाजापुढे ब्राह्मणेतर समाजाच्या उद्धाराचं फार मोठं आव्हान उभं ठाकलं होतं. म्हणूनच सत्यशोधक समाजने धार्मिक, मानसिक, सामाजिक आणि आर्थिक विकासाची उद्दिष्टं समोर ठेवून कार्यास प्रारंभ केला. भाई बागल म्हणतात, 'सत्यशोधक झाल्याखेरीज देवाधर्माच्या, अंधश्रद्धेच्या, रूढीच्या, परंपरेच्या आणि भट-पुरोहिताच्या पकडीतून आपली सुटका होणार नाही, हे बहुजन समाजाला कळलं.' सामाजिक क्रांतीच्या उद्रेकाला आवश्यक असा सात्त्विक संताप निर्माण करण्याचं फार मोठं काम महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजतर्फे केलं.

सत्यशोधक समाज तेहतीस कोटी देव मानत नाही. महात्मा फुले यांनी लोकांपुढे 'निर्मिका'ची कल्पना ठेवली. त्याला पूजा, अर्चा नको, मंदिर नको, कर्मकांड, व्रत-वैकल्यं नकोत, असं सांगितलं. सत्यशोधक समाजाने लोकांना- प्रामाणिकपणे कष्ट करणारा सुखी होतो, असं म्हटलं. सर्व धर्मग्रंथ माणसांनी लिहिले आहेत, म्हणून ते अपूर्ण आहेत. पाप-पुण्य, स्वर्ग-नरक या कल्पना खोट्या आहेत. स्त्री-पुरुष समानच मानावेत. पुराणं व स्मृतिग्रंथ लबाडीने व खोटारडेपणाने भरली आहेत, म्हणून त्यांच्यावर विश्वास ठेवू नये. वेद हे माणसांनी लिहिले, आपली कामं हाच आपला धर्म असं मानावं, सदाचरण प्रत्येकाने कसोशीने करावं, धमार्ची चिकित्सा तकार्ने-विचाराने करावी. दैव, भाग्य या खोट्या कल्पना ज्योतिषी लबाडांनी पसरवल्या म्हणून त्यांच्यावर विश्वास ठेवू नये. व्यसनमुक्ती व अज्ञानमुक्ती हे प्रत्येकाचं कर्तव्य आहे. श्राद्धादी कृत्यं ही पोटभरू भट-ब्राह्मणांनी लोकांना सांगितली. माणसाला पुनर्जन्म नाही, असा अत्यंत वास्तववादी उपदेश सत्यशोधक समाजने समस्त समाजाला करून भटीथोतांडातून समाजमन मुक्त केलं.

महात्मा फुले यांनी लोकोद्धारासाठी आपली संपूर्ण आर्थिक, सामाजिक आणि शारीरिक शक्ती खर्च करून जो कामाचा डोंगर उभा केला, तो केवळ आश्चर्य करण्याइतका प्रचंड आहे. मृत्यूसमयी हा महात्मा म्हणाला, 'बंधूंनो, आपण खूप कार्य केलं. दोन हजार वर्षांत आपणाला जे मिळालं नाही, ते येत्या पन्नास वर्षांत खात्रीने मिळेल. पण आता पेशवाईत गुरासारखे वागत होता तसं न वागता वाघासारखे वागा!'

क्रांतिबा जोतिरावांच्या सत्यशोधकी कायार्ला प्रणाम करताना या विचार-कार्याचे लाभार्थी कसे व्यवहार करतात; ह्याची तपासणी होणं आवश्यक आहे. कारण-

महात्मा जोतिबा । क्रांतिवीर होते ।
उद्धारक होते । शोषितांचे ॥ १
दया, क्षमा, शांती । यांचे मूर्तरूप ।
बदली विद्रूप । समाजाला ॥ २
लबाड धमार्चा । प्रतिबंध केला ।
शोषणाला आळा । घालावया ॥ ३
सत्यशोधकांची । केली उभी फौज ।
उतराया माज । ऐतोबांचा ॥ ४
समता, स्वातंत्र्य । बंधुताप्रसार ।
ब्रीद जन्मभर । सांभाळले ॥ ५
नव्या युगा जन्म । दिला जोतिबांनी ।
करावया जन्मभूमी । भटमुक्त ॥ ६
भयभीता धीट । करितो महात्मा ।
संजीवक धर्मा । जन्मा घाली ॥ ७
क्रांतिबा जोतिबा । तुम्ही विश्वरत्न ।
पायी हे नमन । नम्रभावे ॥ ८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**

# संविधान जनजागृतीतून समाजपरिवर्तन होईल - डॉ. नांदुरे

## शिवदारे महाविद्यालयात हरघर संविधान उपक्रम उत्साहात




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शिवदारे महाविद्यालयात 'जागतिक लोकशाही दिना' निमित्त हरघर संविधान उपक्रम उत्साहात पार पडला. या अंतर्गत विद्यार्थ्यांना संविधानाचे पुस्तक वाटप करण्यात आले. या कार्यक्रमात प्राचार्य डॉ. डी. एस. सुत्रावे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना भारतीय संविधान पुस्तक वाटप करण्यात आले. याप्रसंगी भारतीय संविधान पुस्तक वाटपाचे पुरस्कर्ते परभणी येथील डॉ. भारत नांदुरे यांनी भारतीय संविधानाच्या एक कोटी प्रति वाटण्याचा संकल्प केला आहे. आतापर्यन्त पाच लाख प्रती वाटप त्यांनी केले आहे. अंदाजे दोन कोटी एवढा खर्च अपेक्षीत आहे. ते स्वतः आपल्या उत्पन्नातून खर्च करणार आहेत. संविधान जन जागृतीतून समाजपरिवर्तन होऊ शकते. सर्व जाती धर्मातील तरुणांना एकत्र करुन संविधानाने दिलेले मुलभूत हक्क आणि राष्ट्राप्रती असलेले आपले कर्तव्य याची माहिती होणे गरजेचे आहे, असे डॉ. भारत नांदुरे आपल्या भाषणात सांगितले. यावेळी प्रा. व्यंकटेश काळे (परभणी), आणि प्रतापसिंह कांचन - पाटील यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक प्रा. चंद्रशेखर उमरजकर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उपप्राचार्य प्रा. एम. बी. पाटील, प्रा. डॉ. डी. डी. बनसोडे यांचे सहकार्य लाभले.

# आम्ही ज्ञानेश महाराव यांच्यासोबत- संभाजी ब्रिगेड

**पुणे (वृत्त सेवा) :-** संभाजी ब्रिगेडच्या नवी मुंबई येथे पार पडलेल्या अधिवेशनात ज्येष्ठ संपादक व विचारवंत ज्ञानेश महाराव यांचे भाषण झाले. त्यांच्या भाषणाचा विषय होता, ‖भारतीय राज्यघटनेला अभिप्रेत असलेल्या विचारधारेची लोकशाही.‖ संबंधित विषयाला अनुसरून त्यांनी संविधानामध्ये अंतर्भूत असणारी लोकशाही मूल्यं आणि वर्तमान काळात अनुभवायास मिळणारी राजकीय, सामाजिक, आर्थिक, इ. परिस्थिती यांचा तुलनात्मक आढावा घेतला.

विषयाला अनुसरून बोलत असताना त्यांनी मनुस्मृतीच्या कायद्यामुळे भारतीय स्त्रियांना नाकारण्यात आलेले अधिकार, त्यांच्यावर लादलेली बंधने व त्यातून त्यांचे झालेले शोषण याबद्दल काही उदाहरणं दिली. त्यामध्ये त्यांनी पुराणांतील सत्यवान-सावित्रीची कथा, रामायणातील सीतेची अग्निपरीक्षा अशी काही उदाहरणं दिली होती. अलीकडच्या काळात राम या प्रतिकाचा वापर करून संघ, भाजप परिवारातील लोक कशा पद्धतीने धार्मिक राजकारण करत आहेत, सत्ता मिळवून कशा पद्धतीने जनतेला लुटायची कामे करत आहेत आणि हिंदुत्व या आकर्षक नावाखाली कशा पद्धतीने ब्राह्मणी वर्चस्वाचे विचार लोकांच्या डोक्यात घालण्याचे उद्योग करत आहेत या संदभार्ने बोलताना ज्ञानेश महाराव यांनी आपली रोखठोक मते मांडली. पुढे बोलत असताना त्यांनी नाटककार मामा वरेरकर यांच्या 'भूमिकन्या सीता' या नाटकाचा संदर्भ देऊन त्यातील राम आणि लक्ष्मणाची पत्नी उर्मिला यांच्यातील संवाद उद्धृत करताना उर्मिलाने रामाला आपली अग्निपरीक्षा घेण्याचे दिलेले आव्हान याबद्दल माहिती दिली. तसेच रामायणाच्या कथेत रामाने सीतेच्या पातिव्रत्यावर शंका घेणे, एका धोब्याच्या आक्षेपावरून आपल्या गर्भवती पत्नीचा त्याग करून तिला जंगलात सोडण्याचा निर्णय घेणे, आपल्या पत्नीचे पावित्र्य तपासण्यासाठी तिला अग्नीत उडी घ्यायला सांगणे, इ. प्रचलित गोष्टींमधील नितीमत्तेवर त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित करून वर्तमानकाळाशी तुलना करता आज आपल्या बहिणीसोबत कुणी असा अमानवी व्यवहार केल्यास त्याला आपण सोडू का, असा प्रश्न श्रोत्यांना केला.

ज्ञानेश महाराव यांनी आपल्या संपूर्ण भाषणात इतरही अनेक मुद्दे उपस्थित केले आहेत. त्यामध्ये त्यांनी स्वामी समर्थ यासारख्या टीव्ही सिरियल्सच्या माध्यमातून अंधश्रद्धेचा प्रसार करणाऱ्यांवर आक्षेप घेतला आहे. तसेच एरवी समाजात वावरताना कसे कपडे घालावे याचे सल्ले देणारे तथाकथित संस्कृतीरक्षक अशा सिरियल्समधून होणाऱ्या उत्तान अंगप्रदर्शनाकडे कसे दुर्लक्ष करतात हा विरोधाभास त्यांनी दाखवून दिला. यासोबतच करोडो भाविकांचे श्रद्धास्थान असणाऱ्या पंढरपूरच्या विठ्ठल-रखुमाई मंदिरातील पवित्र तीर्थकुंडात, ज्या कुंडातील पाणी वारकरी तीर्थ म्हणून प्राशन करतात, तिथे गोपाळ रामचंद्र बडवे नावाचा पुजारी १५ मे २००३ रोजी मध्यरात्री लघवी करताना सापडला होता, याचीही त्यांनी आठवण करून दिली. मुळातच महाराष्ट्राच्या संत परंपरेतील संतांनी नामस्मरण हा सोपा भक्तिमार्ग सांगून दगडामध्ये देव शोधण्यासाठी तीर्थस्थळी जाणाऱ्या लोकांवर कडक शब्दात प्रहार केले आहेत. त्याच संतवाणीचा दाखला देऊन ज्ञानेश महाराव यांनी वारकरी बांधवांना संतांचे तरी विचार जोपासा असे आवाहन केले.




ज्ञानेश महाराव यांच्या उपरोक्त काही मांडणीवर आक्षेप घेऊन त्यांचे संपूर्ण भाषण न पाहता केवळ त्यांची काही अर्धवट वाक्यं कट करून गेल्या काही दिवसांत त्याचे व्हिडिओ सोशल मिडियात पसरवून आकांडतांडव करण्यात आला. त्यांच्याबद्दल अनेक चुकीच्या बातम्या पसरवण्यात आल्या. त्यांच्याविरोधात अनेक ठिकाणी निषेध, आंदोलने करण्यात आली. गुन्हे दाखल करण्याचे सत्र सुरु झाले.

मुळात ज्ञानेश महाराव यांचे संपूर्ण भाषण यांनी पाहिले आहे का? तसेच त्यांना ते समजले आहे का? कारण आपल्या देशात राज्यघटना लागू झालेल्याला पुढच्या वर्षी ७५ वर्ष पूर्ण होत आहेत. आपल्या देशाने लोकशाही स्वीकारली आहे आणि या लोकशाहीमध्ये प्रत्येक नागरिकाला अभिव्यक्तीस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य आहे. लोकशाहीच्या या मूल्यांचा आपण आदरच केला पाहिजे. कुठल्याच धर्मात कुठल्याही महिलेचे धर्माच्या नावाखाली शोषण होऊ नये, लोकशाही मूल्यं पायदळी तुडवून धर्मांधता वाढीस लागू नये हीच अपेक्षा आहे. लोकशाहीपेक्षा कुठलाही धर्म आणि राज्यघटनेपेक्षा कुठलंही धार्मिक पुस्तक मोठं नाही हे वर्तमान वास्तव आहे. त्यामुळं ज्ञानेश महाराव आपल्या भाषणातून जे सांगतात ते त्याच राज्यघटनेची आणि त्यातील मूल्यांची जपणूक करणारे आहे. त्यांची भाषा रोखठोक असेल, पण आताच्या उन्मादी धार्मिक वातावरणात याच भाषेची गरज भासत असते. मात्र त्यावरून समाजातील भावनिक लोकांना भडकावून संघ, भाजप परिवारातील तथाकथित संस्कृतीरक्षक लोक त्यांना ज्ञानेश महाराव यांच्यावर गुन्हे दाखल करण्यासाठी उद्युक्त करत आहेत. ज्ञानेश महाराव यांच्यावर दबाव टाकण्याचा, त्यांना मानसिक त्रास देण्याचा प्रयत्न करत आहेत. पण हे करून प्रश्नांची उत्तरे मिळतील काय? प्रश्न तर जागच्या जागीच राहतील आणि हिंदुत्वाच्या नावाखाली समाजाचे असेच भावनिक शोषण होत राहील. रामाचे एकंदर चरित्र त्याज्य असल्याचे कुणीही मानत नाही, परंतू पुराणात उभ्या केलेल्या रामाच्या व्यक्तिमत्वाची चिकित्सा करून त्याच्या चरित्रातील अमान्य असणाऱ्या घटना नाकारण्याचे अथवा त्या घटनांबाबत दोष देण्याचे स्वातंत्र्य प्रत्येकाला आहे. प्रत्येकाने एकमेकांच्या या स्वातंत्र्याचा आदर केला पाहिजे, तीच लोकशाहीची खरी ओळख आहे.

मात्र ७५ वर्षांनंतरही आपली लोकशाही अजून परिपक्व झाली की नाही हा प्रश्न पडतो. समाजात वैचारिक घुसळण करायची सोडून प्रतिवादापासून पळ काढणे हे परिपक्व लोकशाहीला अभिप्रेत नाही. म्हणूनच भारतीय राज्यघटनेला अभिप्रेत असणाऱ्या विचारधारेची लोकशाही कोणती हे समाजाला सांगण्याची आज गरज पडत आहे. ते सांगण्याचे धाडस ज्ञानेश महाराव करत आहेत. त्यांच्या धाडसाला सलाम.

हे तेच ज्ञानेश महाराव आहेत ज्यांनी २००३ मध्ये सर्वप्रथम जेम्स लेन या विदेशी लेखकाने पुण्यातील ब्राह्मण मंडळींच्या मदतीने जिजाऊ-शिवरायांच्या बदनामीचा केलेला प्रयत्न समाजासमोर उघडा पाडला होता. अशा सच्चा शिवप्रेमी व्यक्तीला संघ, भाजप परिवारातील व्यक्तींकडून त्रास देण्याचा प्रयत्न होत असेल तर तो खपवून घेतला जाणार नाही.

संभाजी ब्रिगेड पूर्ण ताकतीने ज्ञानेश महाराव यांच्या पाठीशी उभी आहे. शिवराय-फुले-शाहू-आंबेडकर यांना आणि राज्यघटनेला जी स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि न्याय या मूल्यांवर आधारित असणारी विचारधारा अभिप्रेत आहे, त्याच्या रक्षणासाठी आणि रक्षणकर्त्यांसाठीही संभाजी ब्रिगेड लढत राहणार असल्याचे सांगितले.

## वात्रटिका

### भिजत घोंगडे

सगळ्यांनाच पटते
पण प्रश्न सुटत नाही...
सुटलाच पाहिजे असं
कोणालाच वाटत नाही...
मोसम रणधुमाळीचा आहे
आपले काही शिजले पाहिजे...
अशा वातावरणात खरेतर
धोंगडे भिजत राहिले पाहिजे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# मनोज जरांगे पाटलांच्या मागणी समर्थनार्थ कुर्डूवाडी, भोसरे, कुर्डू कडकडीत बंद



**कुर्डुवाडी (कटूसत्य वृत्त):-** संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे या मागणीसाठी अंतरवाली सराटी जि.जालना येथे सुरू असलेल्या अमरण उपोषणास समर्थन देण्यासाठी सोमवार दि. २३ रोजी माढा तालुका सकल मराठा समाजाच्या वतीने कुर्डूवाडी शहर, कुर्डू, भोसरे गाव कडकडीत उस्फूर्त बंद होते.

मराठा समाज बांधव सोमवारी दुपारी ११ वाजता कुडूर्वाडी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये छत्रपतींच्या पुतळ्याला पुष्पहार घालत शहरातील सर्व महापुरुषांच्या पुतळ्याला पुष्पहार घालत मराठा बांधव प्रांत कार्यालयात पोहोचले. प्रांताधिकारी प्रियंका आंबेकर यांना निवेदन देण्यात आले.

मराठा समाजाला ओबीसीतून ५० %च्या आत आरक्षण मिळावे, शासनाने मराठा आणि कुणबी एकच असल्याचा अध्यादेश काढावा, मराठ्यांच्या कुणबी नोंदींवरून सगेसोयऱ्यांनाही आरक्षण द्यावे आणि हैदराबादसह सातारा संस्थान आणि बॉम्बे गॅझेट लागू करा, मराठा आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्यात यावेत. मराठा संघर्षयोद्धा मनोज जरांगे-पाटील यांची तब्येत खालावत चाललेली असून मनोज जरांगे-पाटील यांनी ज्या मागण्या महाराष्ट्र शासनाकडे मांडल्या आहेत. त्या शासनाने तात्काळ मंजूर कराव्यात असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

हा बंद यशस्वी करण्यासाठी सर्व मराठा बांधवांनी कष्ट घेतले. मराठा समन्वयक संजयदादा टोणपे, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष सचिनबापू जगताप, पंचायत समिती सदस्य सुरेश बागल, बाबासाहेब गवळी, वाहिद शेख, दत्ता काकडे, अरुण काकडे मच्छिंद्र कदम, शिवाभाऊ गवळी, दत्तात्रय जगताप, सुरेश बागल, पप्पू भोसले, प्रमोद बागल, निलेश देशमुख, प्रशांत जगताप, अमरसिंह भोरे, शहानवाज शेख, बाळासाहेब बागल, अरुण काकडे, शामराव बोराडे, चंद्रकांत गवळी, हरिभाऊ बराटे, हरिभाऊ बागल, संदीप भराटे संजय गोरे, दिनकर टोणपे, दत्ताजी गवळी, धनंजय भोसले, सौरभ भोसले, हनुमंत कडबाने, गणेश कदम, प्रदीप पाटील, शंकर उबाळे, टी आर पाटील, बालाजी जगताप, रमेश परबत, नामदेव ढेकळे, विनायक राऊत, शहाजी गवळी, अनिल बागल, ॲड अशोक पाटील, अजित सुराणा, सतीश बागल, बाबुराव चव्हाण, महादेव बागल, प्रशांत गायकवाड, राजकुमार देशमुख, ॲड आडकर, गणेश बागल, निलेश गवळी, उल्हास पाटील, सतीश महींगडे, अनिल गवळी, प्रदीप टोणपे, दत्ता रेडे, पिंटू पवार, पंडित आवताडे, नितीन आवताडे, नानासाहेब पाटील, राजू टोणपे, सचिन बर्डे, प्रमोद घाडगे, संदीप पाटील, लक्ष्मण बागल, वैभव बागल, धनू कदम, गणेश कदम आदी उपस्थित होते.

# मोहोळ ग्रामीण रुग्णालयात मृत्यूनंतरही मृतांचा शवविच्छेदनासाठी संघर्ष सुरु




**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** अनेक अडचणींचा सामना करत माणूस आयुष्याचा संघर्ष जिंकण्यासाठी प्रयत्न करतो. त्यातील काहीजण त्या संघषार्ची वाट अर्धवट सोडून मृत्यूपाशात अडकतात. म्हणतात ना मृत्यूनंतर सगळा संघर्ष संपतो, परंतु मोहोळ येथील ग्रामीण रुग्णालयात मृत्यूनंतर शवविच्छेदनासाठी आलेल्या मृतांना संघर्ष करण्याची दुर्दैवी वेळ आली आहे.

दोन ते अडीच महिन्यांपासून शवविच्छेदन करणारा कर्मचारीच जागेवर नसल्यामुळे नातेवाईकांना आरोग्य विभागाच्या पाया पडून कर्मचारी उपलब्ध करावा लागत आहे. मृतांना सुद्धा ताटकळत ठेवण्याची किमया आरोग्य यंत्रणे कडून केली जात आहे.

आरोग्य यंत्रणा सक्षम झाली असल्याचे एकीकडे महाराष्ट्र शासन छातीठोकपणे सांगत असले तरी, दुसरीकडे मात्र माणसाला जिवंतपणी आरोग्याच्या सोयी सुविधा मिळवण्यासाठी संघर्ष करावा तर लागत आहेच, मात्र मोहोळ ग्रामीण रुग्णालयात माणसांना मेल्यानंतरही शवविच्छेदनासाठी संघर्ष करण्याची दुर्दैवी वेळ आली आहे. 40 ते 45 हजार लोकसंख्येचे शहर व तालुक्याचे ठिकाण असलेल्या मोहोळ शहरांमध्ये ग्रामीण रुग्णालय आहे. तीन राष्ट्रीय महामार्ग असल्यामुळे अपघातांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे, तसेच आत्महत्यांचे प्रमाणही दिवसेंदिवस वाढत आहे. अशातच मोहोळ येथील ग्रामीण रुग्णालयाची आरोग्य यंत्रणा सक्षम करणे आवश्यक असताना मोहोळ ग्रामीण रुग्णालयातील शवविच्छेदन करणारा कर्मचारी गेल्या दोन ते अडीच महिन्यांपासून नागरिकांना उपलब्ध होत नाही.

त्यामुळे मोहोळ ग्रामीण रुग्णालयात मृत्यू झालेल्या एखाद्या व्यक्तीला किंवा महिलेला आणल्यानंतर नातेवाईकांना त्यांचे दुःख बाजूला ठेवून शवविच्छेदन करणारा कर्मचारी कुठे उपलब्ध होईल का? यासाठी ग्रामीण रुग्णालयातील कर्मचार्यांना हात जोडण्याची वेळ आली आहे. जरी कर्मचारी उपलब्ध झाला तरी नातेवाईकांची त्यातूनही आर्थिक पिळवणूक सुरू आहे. मृत्यूनंतरही माणसाला तासान् तास ताटकळत राहण्याची वेळ मोहोळ ग्रामीण रुग्णालयाच्या व जिल्हा आरोग्य यंत्रणेच्या कारभारामुळे आली आहे. 1 ते 20 सप्टेंबरपर्यंत मोहोळ पोलिस ठाण्याच्या हद्दीत अपघात व आत्महत्या अशा एकूण 7 जणांचा मृत्यू झाला आहे. मोहोळ येथील ग्रामीण रुग्णालयात तात्काळ शवविच्छेदन करर्णाया कर्मचार्यांची नेमणूक करण्याची मागणी नातेवाईकांमधून केली जात आहे.

# माळीनगर आय.टी.आयचा निकाल ९३.७९ टक्के







**माळीनगर (कटूसत्य वृत्त):-** डि.जी.टी नवी दिल्ली यांच्या वतीने घेण्यात आलेल्या अखिल भारतीय व्यवसाय नियमीत परीक्षेचा निकाल नुकताच जाहिर झाला असून या परीक्षेत औद्योगिक प्रशिक्षण संस्था माळीनगर (ता. माळशिरस) येथील संस्थेतील प्रशिक्षणार्थीनी उत्तुंग यश संपादन केले आहे. यामध्ये इलेक्ट्रिशिअन, फिटर, मेकॅनिक मोटर व्हेईकल, मेकॅनिक डिझेल, व वेल्डर या व्यवसायातील अभ्यासक्रमातील अंतिम वषार्चा एकूण निकाल ९३.७९ टक्के लागला आहे. डि.जी.टी नवी दिल्ली यांच्या वतीने जुलै-ऑगस्ट २०२४ मध्ये शिल्प कारागिर योजनेअंतर्गत ही परीक्षा घेण्यात आली होती. प्रात्यक्षिक व कॉम्प्युटर बेस्ड टेस्ट (सीबीटी) पध्दतीने झालेल्या या परीक्षेस अंतिम वर्ष व्यवसाय परीक्षेस एकूण १४७ प्रशिक्षणार्थी बसले होते यापैकी १३६ प्रशिक्षणार्थी चांगल्या गुणांनी उतीर्ण झाले आहेत. या परीक्षेत विश्वजित माने याने ९३.३३ टक्के (इलेक्ट्रिशिअन), रणजित इंगळे याने ९०.३३ टक्के (मेकॅनिक मोटर व्हेईकल), महादेव हजारे याने ७९ टक्के (मेकॅनिक डिझेल), वैभव करमारे याने ७६.१७ टक्के (फिटर), रोहित पाटील याने ७४.१७ टक्के (वेल्डर), यांनी व्यवसायनिहाय प्रथम क्रमांकाने बाजी मारली आहे. या यशाबद्दल दि सासवड माळी शिक्षण संस्थेचे चेअरमन राजेंद्र गिरमे, व्हा. चेअरमन नितीन इनामके, सचिव अजय गिरमे, खजिनदार ज्योतीताई लांडगे, संचालक अशोकराव गिरमे, अनिल रासकर, ॲड.सचीन बधे, रत्नदिप बोरावके, डॉ. अविनाश जाधव, प्रकाश गिरमे, पृथ्वीराज भोंगळे, कल्पेश पांढरे, लिनाताई गिरमे, दिलीप इनामके व विश्वस्त विजयकांत कुदळे, अरविंद जाधव, चंद्रकांत जगताप, सूर्यकांत बोरावके, कोअर्डिनेटर राजीव देवकर तसेच प्राचार्य विराज बधे व सर्व शिक्षक कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे 'ऊस भूषण पुरस्कार' जाहीर

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** येथील कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचा यंदाचा 'पांडुरंग ऊस भूषण' पुरस्कार प्रमोद नाईकनवरे यांना देण्यात येणार आहे. गुरुवारी (ता. २६) कारखान्याची वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली आहे.



या कार्यक्रमात कारखान्याच्या वतीने देण्यात येणाऱ्या 'पांडुरंग ऊस भूषण' व 'पांडुरंग आदर्श शेतकरी' पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे, अशी माहिती कारखान्याचे अध्यक्ष प्रशांत परिचारक यांनी दिली.

गेल्या सहा वर्षापासून कारखान्याचे अध्यक्ष प्रशांत परिचारक यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांना या पुरस्कारांनी सन्मानित केले जात आहे. शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करावा. कारखान्याच्या संपूर्ण कार्यक्षेत्रातील जमिनीची सुपीकता टिकून राहावी. एकरी उत्पादन वाढ व्हावी. कारखान्याला अधिक साखर उतारा असणाऱ्या उसाचा पुरवठा व्हावा, त्यातून शेतकरी आणि कारखान्याची प्रगती व्हावी, हा या पुरस्काराचा मूळ उद्देश आहे. जमिनीची सुपीकता टिकवून अधिकचे ऊस उत्पादन घेणाऱ्या सभासद शेतकऱ्यास 'पांडुरंग ऊस भूषण' दिला जातो. या शेतकऱ्याला एक लाख एक हजार १११ रुपये आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविले जाणार आहे. तर कारखान्याच्या सात शेतकऱ्यांना २५ हजार आणि सन्मानचिन्ह देऊन 'पांडुरंग आदर्श शेतकरी' पुरस्काराने सन्मानित केले जाते.

कारखान्याचे अध्यक्ष प्रशांत परिचारक, उपाध्यक्ष कैलास खुळे आणि संचालक मंडळाच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धेचे मूल्यमापन करण्यात आले आहे. स्पर्धेतील शेतकऱ्यांना कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी, केन मॅनेजर संतोष कुमठेकर, ऊस विकास अधिकारी सोमनाथ भालेकर यांनी विविध स्तरावर मार्गदर्शन केले आहे.

**पुरस्कारांचे मानकरी**

यंदाचा पांडुरंग ऊस भूषण पुरस्कार पटवर्धन कुरोली (ता. पंढरपूर) येथील प्रमोद नाईकनवरे यांना घोषित करण्यात आला आहे. तर खर्डी- पंढरपूर गटातून नारायण रोंगे, वाखरी- देगाव गटातून भीमराव बागल, सिद्धेवाडी- चळे गटातून नागनाथ जाधव, भंडीशेगाव- भाळवणी गटातून चंद्रशेखर कोळवले, भोसे गटातून दत्तात्रय माळी, जळोली- करकंब गटातून धनाजी नरसाळे यांची पांडुरंग आदर्श शेतकरी पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

# राजकारणासाठी शेतक-यांच्या संस्था मोडीत काढु नका- खा. धैर्यशील मोहिते पाटील



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्रातील सहकारी संस्था या शेतक-यांच्या, कष्टक-यांच्या घामातुन उभा राहिल्या आहेत. संस्था बंद पडली तर काय होते हेही महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी, कामगारांनी पाहिले आहे. सध्या राज्यात विधानसभेचे वारे वाहु लागले आहे. प्रत्येकाला आमदारकीची स्वप्ने पडु लागली आहेत. स्वतःच्या स्वार्थासाठी शेतकऱ्यांच्या या संस्था मोडीत काढु नका असा मौलीक सल्ला खा धैर्यशील मोहिते पाटील यांनी दिला.

सदाशिवनगर येथील श्री शंकर सहकारी साखर कारखान्याची ५५ वी वार्षिक सर्वसाधरण सभा चेअरमन आ रणजितसिंह मोहिते पाटील यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या व उत्साही वातावरणात पार पडली.

प्रारंभी कारखान्याचे जनरल मॅनेजर रवींद्र जगताप यांनी अहवाल वाचन केले. त्याला सभासदांनी एकमुखाने मंजुरी दिली.

खा धैर्यशील मोहिते पाटील म्हणाले, रणजितदादांच्या कडकशीस्तीत कारखाना प्रगतीपथावर आहे. २००९ पासून जिल्ह्यातील राजकारणाची दिशा बदलली आहे. सध्या जिल्ह्यात आमदारकीसाठी स्पर्धा लागली आहे. शेतकऱ्यांच्या संस्था टिकल्या पाहिजेत. राजकारणासाठी कोणी शेतक-यांची संस्था मोडीत काढत असेल तर शेतक-यांनी त्यांना त्यांची जागा दाखवावी असे सांगून दि. २९ सप्टेंबर रोजी माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांचा अकलूज येथे नागरी सत्कार आयोजित केला असून हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन त्यांनी केले.

आ. रणजितसिंह मोहिते पाटील म्हणाले, संस्था टिकली तर शेतकरी, कामगार टिकेल. सहकार महर्षिनी उभा केलेल्या संस्था टिकविण्यासाठी विजयदादांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही सर्वजण प्रयत्नशील आहोत. श्री शंकर सहकारीसाठी केंद्र व राज्य सरकारने ११३ कोटीची मदत केली. अडीच हजार टनी साखर कारखाना आता सात हजार टनी करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी मिळाली आहे. त्यासाठी १७० कोटीची गुंतवणुक करावी लागेल. ११० कोटी वित्तीय संस्थाकडून तर ६० कोटी कारखान्याकडून गुंतवणुक करावी लागणार आहे. पुढील ८ वर्षे दुष्काळ पडला नाही तर कारखाना कर्जमुक्त होइल असे सांगून सभासदांना १८ रुपये किलो दराने दहा किलो, ज्या शेतक-यांनी कारखान्याला उस घातला आहे त्यांना साडेसात किलो तर इतर शेतक-यांना पाच किलो दिवाळीसाठी साखर दिली जाणार आहे. सध्या जिल्ह्यात दराची स्पर्धा लागली आहे. श्री शंकर सहकारीचा एफ आर पी दर २१८२ रुपये बसतो आहे. तरीही आपण २६०० रुपये दर दिला आहे. आता ५० रुपयेचे बील उस उत्पादकांच्या खात्यावर जमा होइल. दिवाळीला आणखी काही करता येते का? ते पाहू.

२०२४ - २५ च्या गळीत हंगामात १८ ते ७० वयोगटातील सभासदांचा एक लाख अपघाती विमा काढणार असल्याचे ते म्हणाले. श्री शंकर सहकारी साखर कारखान्याची वार्षिक उलाढाल 402 कोटीची आहे तर संस्थेची मालमत्ता ही ५५० कोटीची आहे ती भविष्यात 750 कोटी होइल असा विश्वास व्यक्त करुन उस उत्पादकांनी चालू गळीत हंगामात कारखान्यास गाळपास उस द्यावा असे आवाहन त्यांनी केले.

या वार्षिक सभेस माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, व्हा. चेअरमन ॲड मिलींद कुलकर्णी, ॲड प्रकाश पाटील, रामचंद्र सावंत पाटील, दत्तात्रय भिलारे, बाबाराजे देशमुख, अर्जुनसिंह मोहिते पाटील, विश्वतेजसिंह मोहिते पाटील, एक्झीक्युटर डायरेक्टर स्वरुप देशमुख, कार्यकारी संचालक अभिजीत डुबल यांच्यासह संचालक, सभासद व कामगार उपस्थित होते.

# महेंद्र गायकवाड ठरला मनसे केसरी कुस्ती स्पर्धेचा मानकरी



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते दिलीपबापू धोत्रे यांनी मंगळवेढा येथे आयोजित केलेल्या मनसे केसरी कुस्ती स्पर्धेचे उद्घाटन मनसे नेते तथा मनसे विद्यार्थी सेनेचे अध्यक्ष अमित ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेमध्ये मनसे केसरीचा मानकरी ठरला महाराष्ट्र केसरी महेंद्र गायकवाड. यावेळी महेंद्र गायकवाड यांना अमित साहेब ठाकरे यांच्या हस्ते चांदीची गदा व रोख रक्कम व सन्मान चिन्ह प्रदान करण्यात आले. यावेळी बोलताना अमित ठाकरे यांनी मनसे नेते दिलीप बापू धोत्रे यांचे भरभरून कौतुक केले. व पुढील राजकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने मनसे केसरी 2024 या जंगी कुस्त्यांचे आयोजन मनसेचे युवानेते अमित ठाकरे यांच्या उपस्थितीत मंगळवेढा येथील इंग्लिश स्कूल येथे करण्यात आले होते. कार्यक्रमासाठी अमित ठाकरे मंगळवेढा येथे दाखल होताच त्यांचे दामाजी चौकामध्ये दहा जेसीबीच्या साह्याने फुलांची उधळण करून जोरदार स्वागत करण्यात आले. याचबरोबर मनसेचे अधिकृत उमेदवार दिलीप धोत्रे यांचेही जोरदार स्वागत करण्यात आले. याप्रसंगी सोलापूर व पंढरपूर विभागातील मनसेचे वरिष्ठ पदाधिकारी उपस्थित होते.

मनसे केसरी 2024 साठी महाराष्ट्र केसरी महेंद्र गायकवाड व छत्रसाल स्टेडियम दिल्लीचे आशिष हुड्डा यांच्यात लढत झाली. दहा मिनिटे चाललेल्या या कुस्तीत पैलवान महेंद्र गायकवाड यांनी सुरुवातीपासुन वर्चस्व प्रस्थापित केले होते.शेवटी घुटना डावावर महेंद्र गायकवाड यांनी आशिष हुड्डा यांच्यावर वर्चस्व प्रस्थापित करीत कुस्ती जिंकली. या कुस्तीचे पंच म्हणून महाराष्ट्र केसरी रावसाहेब मगर व पंढरपूरचे माजी नगराध्यक्ष वामन बंदपट्टे यांनी काम पाहिले. यावेळी माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे, मनसे नेते बाबू वागसकर, विनायक महिंद्रकर, प्रशांत गिड्डे, प्रशांत इंगळे, जैनुद्दीन शेख, अमर कुलकर्णी, मनसे तालुका प्रमुख नारायण गोवे, जिल्हा उपप्रमुख चंद्रकांत पवार, कोल्हापूरचे पवन महाडिक, दादा धोत्रे, महाराष्ट्र केसरी समाधान घोडके, मंगळवेढा तालुका कुस्तीगीर संघटनेचे अध्यक्ष दामोदर घुले, कुस्ती आखाडा प्रमुख मारुती वाकडे, महेंद्र देवकते, मुरलीधर सरकळे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना दिलीप धोत्रे म्हणाले की पंढरपूर - मंगळवेढा तालुक्यातील प्रत्येक बेरोजगार युवक, महिला भगिनी यांच्या हाताला काम देणे हे माझे कर्तव्य समजतो. येत्या आठवडाभारत नोकरी महोत्सव घेऊन प्रत्येकाच्या हाताला काम देण्याचा निर्धार त्यांनी यावेळी व्यक्त केला. मनसे केसरी 2024 या कुस्ती आखाड्यात स्थानिक मल्लापासून राष्ट्रीय मल्लांनी कुस्तीचा खेळ दाखवीत कुस्ती शौकैनांची मने जिंकली. कुस्ती पाहण्यासाठी हजारो कुस्ती शौकीन उपस्थित होते. धनाजी मदने व अशोक धोत्रे यांनी निवेदन करीत उपस्थितांची मने जिंकली. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून अर्जुन अवॉर्ड विजेते, हिंद केसरी, रूस्तम-ए-हिंद. महासम्राट, कुस्ती सम्राट, भारत भीम, तसेच महाराष्ट्र केसरी, शिव छत्रपती पुरस्कार प्राप्त, ऑल इंडिया चॅम्पियन, महाराष्ट्र चॅम्पियन, राष्टकुल सुवर्ण पद विजेते, तसेच राज्याच्या विविध भागातील पैलवान यांनीही उपस्थित राहून कुस्ती स्पर्धेतील कुस्तीपटूना प्रोत्साहन दिले.

# वृक्ष संवर्धन समिती ने केली सार्वजनिक वाचनालयाची स्वच्छता



**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** रविवारी बाशीर्तील वृक्ष लागवड आणि संवर्धन चळवळीचे आद्य प्रवर्तक वायुपुत्र नारायण बाबा जगदाळे यांच्या जयंती निमित्त वृक्ष संवर्धन समिती मार्फत शहरातील दीडशे वर्षापूर्वी स्थापन झालेल्या ऐतिहासिक सार्वजनिक वाचनालयाची स्वच्छता केली सर्व स्वच्छता झाल्यानंतर वायूपुत्र बाबांना आदरांजली वाहण्यात आली.या वेळी प्रा.शशिकांत धोत्रे, माजी शिक्षण अधिकारी विष्णूपंत कांबळे तसेच वाचनालयाचे अध्यक्ष अशोक सावळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.यावेळी सर्वांनी वृक्ष संवर्धन समिती च्या कार्याचे कौतुक केले. बाबांच्या आठवणी ला उजाळा दिला. यावेळी रिलायन्स गॅस पॉईट चे सरव्यवस्थापक पवनकुमार देशमुख, टेक्निकल हायस्कूल चे मुख्याध्यापक टकले सर हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्र संचालन डॉ.प्रा.सचिन चव्हाण यांनी केले प्रस्ताविक वृक्ष संवर्धन समिती चे अध्यक्ष उमेश काळे यांनी केले तर आभार सचिन मस्के यांनी मानले.

या स्वच्छता उपक्रमात योगेश गाडे, दीपक जाधव,चंद्रकांत बुगडे, दादा गवळी, उदय पोतदार, मोहम्मद शेख, महेश बकशेट्टी, हमने सर, रतीकांत हामने, अक्षय भुईटे, प्रवीण गटकुळ, ग्रंथपाल आशिष चौधरी, सचिन यादव तसेच ध्यास कोचिंग क्लास चे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्यातील कोतवालांना चतुर्थ श्रेणी कर्मचारी म्हणून सामावून घेण्याची आ समाधान आवताडे यांची मागणी



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** राज्याच्या महसूल विभागातील कोतवाल कर्मचाऱ्यांना वेतन श्रेणी निश्चित करून शासकीय सेवेमध्ये चतुर्थ श्रेणी कर्मचारी म्हणून सामावून घेण्यात यावे या मागणीसाठी पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांनी राज्याचे महसूल मंत्री मा.ना.राधाकृष्ण जी विखे-पाटील यांची मंत्रालयीन दालनात भेट घेऊन सदर मागणीचे त्यांना पत्र दिले आहे.

महाराष्ट्र राज्यातील कोतवाल ही शासकीय कामास बांधील राहून कर्तव्य व जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे पार पाडत आहेत. राज्यातील लोकसंख्या ठिकाणी कोतवाल हे सजा मुख्यालय सोडून जिल्हाधिकारी कार्यालय, उपविभागीय कार्यालय, तहसील कार्यालय या ठिकाणी वर्ग ३ व वर्ग ४ या पदावरील कर्मचाऱ्यांची कामे वरिष्ठांच्या लेखी व तोंडी आदेशानुसार करत आहेत. कोतवाल हे पद महसूल विभागातील गाव पातळीवर शेवटचे महत्त्वाचे पद आहे. निवडणुका व विविध शासकीय योजना सामान्य जनतेपर्यंत पोहोचवण्यात त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे.

गाव पातळीवरील विविध शासकीय व निम-शासकीय कर्तव्याशी बांधील राहून लोककेंद्रीत विविध योजनांच्या विस्तारासाठी कोतवाल हा महत्वपूर्ण समन्वयक समजला जातो. कोतवाल बांधवांच्या भविष्यसाध्य बाबींचा विचार करून त्यांना या पदावर नेमणूक द्यावी अशी मागणी यावेळी आमदार आवताडे यांनी सदर पत्रामध्ये नमूद केली आहे.

सदरप्रसंगी जेष्ठ पत्रकार अबुक सुतार तसेच संबंधित प्रशासकीय विभागातील अधिकारी आणि पदाधिकारी उपस्थित होते.

# जन आरोग्य योजनांचा लाभ शेवटच्या लाभार्थ्यापर्यंत पोहोचण्यासाठी स्वयंसेवी संस्थांनी पुढाकार घ्यावा - डॉ. ओमप्रकाश शेटे

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** एकत्रित प्रधान मंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना या आरोग्य योजनांचा लाभ तळागाळातील जास्तीत जास्त नागरिकांना घेता यावा यासाठी जिल्ह्यातील स्वयंसेवी संस्थांनी पुढाकार घ्यावा यासाठी मोठ्या प्रमाणावर जनजागृती मोहीम राबवावी, असे आवाहन आयुष्यमान भारत मिशन समितीचे प्रमुख डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आयुष्यमान भारत मिशन अंतर्गत च्या योजनांच्या कामकाजाचा आढावा बैठकीत डॉ. शेटे बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, जिल्हा शल्य चिकित्सक सुहास माने, जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना सोलापूर जिल्हा समन्वयक डॉ.माधव जोशी, डॉ. दीपक वाघमारे, सोलापूर महानगरपालिकेच्या डॉ. मंजिरी कुलकर्णी जिल्ह्यातील विविध रुग्णालयाचे डॉक्टर्स व प्रतिनिधी उपस्थिती होते.

डॉ. शेटे पुढे म्हणाले की सोलापूर जिल्ह्यातील एक ही पात्र लाभार्थी शासनाच्या आरोग्य योजना पासून वंचित राहणार नाही यासाठी सर्व शासकीय यंत्रणांनी प्रयत्न करावे. महात्मा फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत जास्तीत जास्त लाभार्थी पात्र ठरतील यासाठी त्यांना सहकार्य करावे. या आरोग्याच्या योजना तळागाळातील नागरिकापर्यंत पोहोचण्यासाठी जिल्ह्यातील स्वयंसेवी संस्थांनी व सामाजिक संस्थांनी पुढाकार घेऊन या लोकांमध्ये योजनेविषयी जनजागृती करून त्यांना योजनेचे महत्त्व पटवून दिल्यास एकही रुग्ण वैद्यकीय सेवेपासून वंचित राहणार नाही असे त्यांनी सांगितले.

तसेच जन आरोग्य योजना सर्वसामान्य पर्यंत पोहोचण्यासाठी



आरोग्य मित्रांची संख्या वाढविण्यात यावी व आपले 12 अंकी रेशन कार्ड अद्यावत करून घ्यावे. जिल्हा पुरवठा विभागाने रेशन कार्ड अद्यावत करण्यासाठी मदत करावी. या योजनेचा लाभ देण्यासाठी जिल्ह्यात प्राधिकृत केलेल्या रुग्णालयांनी त्यांच्याकडे योजनेअंतर्गत रुग्णांची नोंदणी झाल्यास त्या रुग्णाला तात्काळ सर्व विविध नियमवलीप्रमाणे दजेर्दार आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. रुग्णालयातील आरोग्य सुविधा व अन्य सुविधाच्या अनुषंगाने योजनेच्या एकाही रुग्णांची अथवा त्याच्या नातेवाईकांची तक्रार येणार नाही याबाबतही रुग्णालयांनी योग्य ती दक्षता घ्यावी असेही डॉ. शेटे यांनी सूचित केले.

सोलापूर जिल्ह्यात एकुण लाभार्थी प्रधानमंत्री एकुण लाभार्थी 11 लाख 58 हजार 758, पिवळे व केसरी रेशन कार्ड लाभार्थी 11 लाख 88 हजार 197, शुभ्र रेशन कार्ड लाभार्थी 16 लाख 65 हजार 697, एकुण लाभार्थी संख्या 40 लाख 12 हजार 652, एकुण आयुष्यमान कार्ड वाटप 10 लाख 43 हजार 671, सोलापूर जिल्ह्यात एकुण आयुष्यमान कार्ड वाटप 26 टक्के झाले असून एकुण आयुष्यमान कार्ड पेंडिंग 29 लाख 69 हजार 41, सोलापूर जिल्ह्यात एकुण आयुष्यमान कार्ड पेंडिंग 74 टक्के आहेत. तरी आयुष्यमान भारत योजनेचे प्रलंबित असलेले सर्वकाळ लवकरात लवकर लाभार्थ्यांना पोहोचतील याबाबत सर्व संबंधित यंत्रणांनी नियोजन करावे असे डॉक्टर शेटे यांनी सुचित केले.